RNI No. MAHMAR/ 2010/37876
Post Regd. No. Akola/Dn/129/2021-23

-संपादक-
शंकर आडे
मो. नं. ८८०९९५५०६१

साप्ताहिक
# सेवाभूमि

DIGITAL EDITION
-कार्यकारी संपादक
श्रीपत राठोड
-उपसंपादक
अशोक रत्नपारखी
-सह संपादक
मधुकर जाटोद

पोहरादेवी जिल्हा : वाशिम ■ वर्ष १४ वे ■ अंक १०३ ■ बुधवार, दि. ९ ऑक्टोबर २०२४ ■ पृष्ठे ४ ■ किंमत-२ रुपये.

# वसंतराव नाईक यांना भारतरत्न द्या

## मुख्यमंत्र्यांसह विविध लोकप्रतिनिधी कडे साकडे



यवतमाळ (प्रतिनिधी) : हरितक्रांतीचे प्रणेते, महाराष्ट्राचे सलग 11 वर्ष नेतृत्व करणारे स्व.वसंतराव नाईक यांच्या कार्याची दखल घेवून त्यांना सर्वोच्च सन्मान भारतरत्न ने सन्मानित करण्यात यावे.अशी मागणी शेतकरी प्रथम चे संस्थापक हरिविजय राठोड यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे ,अजीत पवार साहेब ,उद्धव ठाकरे ,देवेंद्रजी यांचे सह विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, नाना पटोले , संजयभाऊ राठोड , मंत्री तथा राज्यातील 35 लोकप्रतिनिधी कडे एका निवेदनातून केली आहे. देश दुष्काळात होरपळत असताना हरितक्रांती करीत महाराष्ट्राला सुजलाम सुफलाम करण्याचे काम वसंतराव नाईक यांनी केले. रोजगार हमी सारखी योजना ही त्यांनी देशाला दिली.शेती ही उद्योगाची जननी आहे ,शेती समृद्ध झाली तर देश समृद्ध होईल असा त्यांचा ठाम विश्वास होता म्हणून शेती व शेतकऱ्यांच्या उत्थानासाठी त्यांनी जीवनभर कार्य केले. त्यांचे या क्षेत्रातील योगदान पाहून त्याचा जन्मदिन हा कृषी दिन म्हणून साजरा केल्या जातो.अशा या महामानवाच्या कार्याची दखल घेवून त्यांना भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात यावे यासाठी शेतकरी प्रथम चे प्रवर्तक हरिविजय राठोड यांनी मोहीम सुरू केली आहे . वसंतराव नाईक यांचे देशासाठी चे अमूल्य योगदान तथा कृषी क्षेत्रात त्यांनी केलेली हरितक्रांती ची दखल घेवून त्यांना भारतरत्न मिळवण्यासाठी ठोस प्रयत्न करावा अशी मागणी केली.

## विलास रामावत! व्हेरी गुड वर्क-!



पोहरादेवी : दि ५ ऑक्टोबर २०२४ शनिवार सकाळी १० वाजता पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांचे हेलिकॉप्टर पोहरादेवीच्या भूमीवर लँड झाले, निमित्त होते विरासत-बंजारा या सर्वांगसुंदर म्युझियम नंगारा या भव्यदिव्य वास्तूचे लोकार्पण !नामदार संजय राठोड यांचे प्रयत्नाने व संल्पनेतून उभ्या राहिलेल्या नंगारा हे म्युझियम वास्तू कलेचा जगातील एक अप्रतिम नमुना आहे. प्रधानमंत्री मा नरेंद्रजी मोदी यांचे शुभ हस्ते या विश्वधरोहर संत सेवालाल सागर संग्रहालयाचे लोकार्पण लाखो जनसमुदायाच्या उपस्थितीत राज्यपाल श्री सीपी राधाकृष्णन

,राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस व अजित पवार उपमुख्यमंत्री ,मा शिवराज चव्हाण, मा प्रतापराव जाधव केंद्रीय राज्य मंत्री,संत महंत यांच्या साक्षीने संपन्न झाला.नंगारा म्युझियमचे प्रवेशद्वार या ठिकाणी स्वागत करण्यासाठी असलेल्या मान्यवरांमध्ये सेवादळ या चळवळीचे व राष्ट्रीय संघटनेचे विलास रामावत विशेष निमंत्रित होते. मा नरेंद्रजी मोदी यांचे आगमन होताच विलास रामावत यांनी अभिवादन केले, कांही क्षणापूरता त्या दोघांच्या मधला संवाद.

"नमस्ते,जय सेवालाल !मै विलास रामावत !सेवादळ राष्ट्रीय अध्यक्ष हुं!अविवाहित रहकर समाज और राष्ट्र के लिये काम कर रहा हुं!

"व्हेरी गुड वर्क !विलास रामावतजी !-पंतप्रधान उद्‌गारले!"

अभिवादन स्वीकारून व हस्तांदोलन करुन नरेन्द्र मोदी नगारा म्युझियम या सागर संग्रहालयाकडे मार्गस्थ झाले. या क्षणभराच्या भेटीने आनंद तर झालाच पण काम करण्याची प्रचंड ऊर्जा मिळाली. हा प्रसंग व हा संवाद माझ्यासाठी ऐतिहासिक व अविस्मरणीय आहे.

# कारंजा तालुक्यात आरोग्य शिबिराचा हजारो रुग्णांना लाभ



कारंजा : तालुक्यातील गरजू नागरिकांसाठी डॉ. महेश चव्हाण मित्र मंडळ, कारंजा - मानोरा यांनी आयोजित केलेल्या मोफत महाआरोग्य शिबिरात मोठ्या प्रमाणावर रुग्णांनी सहभाग घेतला. ६ ऑक्टोबर २०२४ रोजी आयोजित या शिबिरात विविध आजारांची तपासणी, उपचार आणि गरजेनुसार शस्त्रक्रिया या सुविधा मोफत उपलब्ध करून देण्यात आल्या.

शिबिरात एकूण ४१९८ रुग्णांची विविध आजारांची तपासणी करण्यात आली. यामध्ये डोळे, कान, नाक, घसा, हृदय, मधुमेह, उच्च रक्तदाब आदी सर्वसामान्य आजारांची तपासणी करण्यात आली. तपासणीत ज्या रुग्णांना पुढील उपचार किंवा शस्त्रक्रियेची गरज होती, अशा ८५७ रुग्णांना मोफत उपचारासाठी नोंदवण्यात आले.

या शिबिरामुळे कारंजा तालुक्यातील अनेक गरजू रुग्णांना मोफत वैद्यकीय सुविधा मिळाल्या. या शिबिराच्या यशस्वीतेसाठी डॉ. महेश चव्हाण मित्र मंडळ, कारंजा - मानोरा तसेच या शिबिरात सहभागी झालेल्या सर्व डॉक्टर्स, नर्सिंग स्टाफ आणि स्वयंसेवकांचे कौतुक करण्यात आले.

कारंजा परिसरातील नागरिकांच्या आरोग्यासाठी डॉ. महेश चव्हाण मित्र मंडळाच्या माध्यमातून वर्षभरात अनेकदा आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात येते. या माध्यमातून गरजू रुग्णांना त्यांच्या परिसरामध्ये उपचाराची आणि तपासणीची व्यवस्था झाल्यामुळे अनेक नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

## दलित वस्तीला लागून स्मशानभूमी बांधकाम गंभीर बाब



काटोलः काटोल तालुक्यातील पानवाडी ग्रामपंचायत वॉर्ड क्रमांक २ मधील दलित वस्तीला लागून स्मशानभूमीचे बांधकाम सुरू करण्याचा गंभीर आरोप ग्रामपंचायत सरपंचांवर लावण्यात आला आहे. दलित बांधवांच्या घरांना लागूनच स्मशानभूमी उभारून त्यांना मानसिक त्रास दिला जात असल्याचा आरोप आहे.

याबाबत दलित वस्तीतील नागरिकांनी सांगितले की, गेल्या काही महिन्यांपासून त्यांच्या घरांजवळच मैती पेटवून त्यांना त्रास दिला जात आहे. सरपंचांच्या सांगण्यावरून हा अन्याय केला जात असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. स्मशानभूमीचे बांधकाम गावाच्या बाहेर, नियमानुसार ठिकाणी करण्याची मागणी करत त्यांनी पंचायत समिती, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी आणि जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन दिले आहे. याशिवाय, काटोल पोलीस स्टेशनमध्येही तक्रार दाखल करण्यात आली आहे.

या घटनेचा निषेध दर्शवत माजी सरपंच अर्चना इंगळे, सध्याचे ग्रामपंचायत सदस्य बबीता काळबांडे, राहुल बेहनीया, महेंद्र कुमेरिया, मोनाली काळबांडे, रोशन काळबांडे, हेमराज नाईक, उज्वला नाईक, देवीदास मोहरिया, जीवन कुमेरिया, मंगलाबाई कुमेरिया, प्रवीन सेरोडिया, हरीराम कुमेरिया व इतर गावकरी मंडळी यांनी गावालगत स्मशानभूमी बांधकामाचा निषेध करून उपोषणाचा इशारा सुद्धा दिलेला आहे.

